INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 6.865 (SJIF 2023)

# मराठ्यांचे इतिहासकार न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे

## (Historian of the Marathas Justice Mahadev Govind Ranade)

**डॉ. के. डी. सावंत**
इतिहास विभाग प्रमुख,
महिला कला महाविद्यालय, गेवराई, जि. बीड
E-mail: kailassawant09@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/04.2023-53336254/IRJHIS2304013

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रात श्रेष्ठ, जेष्ठ आणि नामवंत इतिहासकार होऊन गेलेत. का.ना. साने, निळकंठ जनार्धन किर्तने, द. वा. पारसनीस, वासुदेव खरे, डॉ. गणेश खरे, गोविंद सखाराम सरदेसाई, त्र्यंबक शंकर शेजवलकर, विश्वानाथ काशीनाथ राजवाडे, सेतू माधवराव पगडी व न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे इत्यादी नामवंत इतिहासकारांनी ऐतिहासिक क्षेत्रात अत्यंत मोलाचे संशोधन केले आहे. या सर्व इतिहासकारांच्या मालिकेत न्यायमूर्ती गोविंद रानडे यांना निश्चितच मानाचे स्थान आहे. अशा या श्रेष्ठ, जेष्ठ इतिहासकाराचा अभ्यास संशोधक अभ्यासकासमोर यावा हा या संशोधन पेपरचा उद्देश आहे. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे (1848-1901) हे भारतीय प्रबोधनाचे एक अग्रगण्य अभ्यासक म्हणून ओळखले जातात?[1] 'सर्वांगीण सुधारक' अशा चपखल शब्दांत आचार्य जावडेकर यांनी त्यांचा गौरव केलेला आहे. न्यायमूर्ती रानडे यांची थोरवी सांगायची तर लोकमान्य टिळकांनी त्यांच्यावर लिहिलेल्या मृत्युलेखचा निर्देशही पुरेसा आहे. 'महाराष्ट्ररूपी थंड गोळयाला सर्वांगाने उब देणाऱ्या 'न्यायमूर्तीचे वर्णन लोकमान्य टिळकांनी 'सर्वज्ञ: स हि माधव:' या शब्दात केले होते.[2] यात सर्व आले.

येथे न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचा विचार करावयाचा आहे, ते एक इतिहासकार म्हणून वरवर पाहता हे काम फार सोपे आहे. कारण रुढार्थाने न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडेनी केलेले ऐतिहासीक लेखन फार थोडे आहे. तेवढे तपशील सांगितले तरी काम भागू शकेल ! परंतु तसे करणे येथे अभिप्रेत नाही. दुसरे असे की, 'न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे लेखन ऐतिहासिक होते.' या अर्थाचा न. र. फाटक यांचा अभिप्राय ग्राहय मानला तर चर्चेला एक वेगळेच परिणाम लाभेल.[3] तसे ते लाभानेच अभिप्रेत असल्याने न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांची 'धर्मपर व्याख्याने' सुद्धा दुर्लक्षित करून चालणार नाहीत. न्यायमूर्ती रानडे यांचा एकाक्ष इतिहासवेध अनेक चक्षूंनी अभ्यासण्याची आवश्यकता आहे.

इतिहासकार म्हणून न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचा विचार करताना मुळात इतिहास म्हणजे काय, या मूलभूत प्रश्नालाच हात घातला पाहिजे. कारण इतिहासाच्या नाद संकुरित संकल्पनेच्या चौकटीत विचार केला तर न्यायमुर्ती महादेव गोविंद रानडे यांचा इतिहासकार म्हणून असलेल्या थोरवीचे मर्म समजणार नाही.

इतिहास ही मानवाची स्थलकालाच्या संदर्भात सर्वांगीण कथा आहे. ते निव्वळ गतकालीन राजकारण नाही, तर समाज कारण आहे धर्मकारण आहे, गतकालीन साहित्य आणि संस्कृतीसुद्धा आहे. इतिहास हा केवळ कालपट किंवा घटनावर्णन नव्हे. तर ते भूतकालीन घटनांचे अन्वयार्थी परिशीलन आहे. भूत आणि वर्तमान यांच्यात चालणारा सततचा संवाद आहे.

इतिहासाची ही आधुनिक संकल्पना लक्षात घेतली की न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांची इतिहासकार म्हणून असलेली थोरवी किती अनन्य साधारण होती, हे पटू शकते. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे हे संकलक नव्हते. निव्वळ संशोधनापुरता हा त्यांचा थोरविचा गाभा नाही. त्यांनी लावलेला अन्वयार्थ हा त्यांच्या थोरवीचा गाभा आहे. इतिहास लेखनाला सामाजिक शास्त्राची शिस्त देणारे भूतकाळाचा अन्वयार्थ लावणारे आणि भूत- वर्तमानाचा संवाद साधणारे आधुनिक महाराष्ट्रातील पहिले इतिहासकार म्हणजे न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे होत. डॉ. अरविंद देशपांडे लिहितात, "मराठ्यांच्या इतिहासाला तात्वीक अस्ठीस्थान देण्याचे महत्वाचे कार्य न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी केले.[4] इंग्रज राजवटीच्या कालखंडात मराठ्यांच्या इतिहासाची साम्राज्यवादी चौकट आणि अन्वयार्थ पद्धतशीरपणे माथी मारला गेला होता. त्याविरुद्ध राष्ट्रवादी इतिहासलेखा प्रक्रियेचा एक प्रभावी अविष्कार म्हणून न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या लेखनाचा निर्देश करता येईल. अर्थात न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचा राष्ट्रवाद हा संकुचितपणाचा झापडे लावलेला राष्ट्रवाद नव्हता. तर विश्व बंधुत्वाशी अनुबंध साधू पाहणारा व्यापक राष्ट्रवाद होता. साम्राज्यवादी इतिहास लेखनाच्या आणि ग्रँट डफच्या 'वणवा' सिद्धांताचा उथळ प्रविवाद न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी केला नाही. तर सव्यसाची दृष्टीने ऐतिहासिक उत्क्रांती प्रक्रियेचा उलगडा केला.

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या डोळ्यांपुढचा इतिहास पट विस्तृत होता. त्यामुळेच मार्टिन ल्युथरचा काळ व सध्याचा काळ यांची तुलना यासाररव्या निबंध त्यांनी लिहिला आणि मराठा सत्तेच्या उत्कर्षावरील ग्रंथात महाराष्ट्रातील न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे लिहितात, "पश्चिम युरोपातील सुधारणा चळवळीचा इतिहास आणि त्याच वेळी महाराष्ट्र संत, ज्ञानी पुरुष यांचे जीवन, शिकवण आणि साहित्य यातून व्यक्त होत असलेला संघर्ष या दोन्ही गोष्टी विलक्षण मिळत्या- जुळत्या होत्या?[5] आधुनिकत्वाचे रोपटे भारतीय मातीत रुजवायचे तर त्या मातीतला जीवनरस नाकारण्यात हशील नाही, याची जाणीव नवभारताच्या शिल्पकारांना होती. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या लेखनात व कार्यात तर ती प्रकर्षाने दिसून येते. म्हणूनच परंपरेचा नवा अन्वयार्थ त्यांनी लावला. वर्तमान व भविष्याच्या संदर्भात इतिहास विषयीचे नवे आकर्षण 19 व्या शतकातील महाराष्ट्रात निर्माण झाले होते. 'दर्पण' पासून काव्येतिहाससंग्रहा' पर्यंत या आकर्षणाचा प्रत्यय येतो. तत्कालीन साहित्यासुद्धा याची साक्ष देते. इतिहासाव्दारे चाललेल्या या साऱ्या सत्वशोधनाला न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी भक्कम तात्विक अधिष्ठान प्राप्त करून दिले. इतिहास हे त्यांच्या दृष्टीने एक 'साधन होते. तत्कालीन संदर्भात इतिहास जीवनस्पर्शी बनवण्याचे कार्य न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी केले. नुसत्या घटनांचे वर्णन न करता

त्यांनी घटनांमागील प्रेरणा शोधण्याचा प्रयत्न केल्याचा दिसतो. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी मराठ्यांच्या इतिहासाचा अन्वयार्थ अशा जीवन मूल्यांच्या संदर्भात लावला. ज्या मूल्यांवर मराठी समाजाची उभारणी झाली, त्याचे समालोचन आणि प्रसंगी समर्थन ही न्याय- मूर्ती महादेव गोविंद रानडेंनी केले. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या दृष्टीने मराठ्यांच्या उत्कर्षाला भक्तीमार्गी परंपरेतील उदारमतवादी, सुधरणावाद आणि शिवमुद्रेत व्यक्त झालेला लोकहितकारी आशय यांचे अधिष्ठान होते, असे म्हणता येईल. हे अधिष्ठान न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या समकालीन समाजजीवनाला सुद्धा देण्याचा त्यांचा प्रयत्न होता. ग्रँट डफ यांचा 'वणवा सिद्धांत, चुकीचा असून मराठ्यांचा उत्कर्ष म्हणजे उत्क्रांती मार्गाने झालेली राष्ट्र - निर्मितीची प्रक्रिया होती अशा स्वरुपाची मांडणी न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी केली. या मांडणीचा पाया विस्तृत होता. कारण न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे केवळ राजकीय कथा सांगत नव्हते तर राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक प्रेरणांमधून मराठेशाहीच्या उत्कर्षाची उत्क्रांती कशी साधली हे त्यांनी विशद केले. ही विवेकनिष्ठ शास्त्रीय मांडणी होती. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या अन्वयार्थाबाबत मतभेद संभवतात. पण हा अन्वयार्थ ज्या पध्दतीने त्यांनी काढला त्यामुळे मराठीत इतिहासाच्या समाजशास्त्रीय विवेचनाचा आरंभ झाला. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या विवेचनातील अनेक तपशिलांशी तीव्र मतभेद दर्शवणाऱ्या इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांनी ही न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या सैद्धांतिक बैठकीबाबत प्रशंसा केली.

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या इतिहास मीमांसेन आशावादाला महत्वाचे स्थान आहे. मराठ्यांच्या पतनाची थोडीबहुत मीमांसा करतानासुद्धा ते दोष आता टाळावेत, यावर भर देण्याचा न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचा हेतू असवा असे दिसते. मार्टिन ल्युथरच्या काळाशी तुलना करणाऱ्या त्यांच्या लेखतूनही त्यांच्या आशावादाचे प्रत्यंतर येते. पूर्वीची परंपरा व पुढच्या आशा यांचे संमेलन होऊन जेणेकरून मध्ये फूट पडलेली दिसणार नाही. अशारीतीने आपण आपल्या प्रयत्नांची दिशा राखली पाहिजे, असे न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे म्हणतात हे अर्थपूर्ण असल्याचे दिसते. किंबहूना हा त्यांच्या उदारमतवादी विचार व कार्याचा गाभा होता.[6]

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांना देशाचा सर्वांगीण विकास अभिप्रेत होता. संत व शिवकालीन महाराष्ट्र इतिहासाचे मर्म सांगताना त्यांनी या गोष्टीवर भर दिला. "ज्या देशांत एकाच अंगचा थोरपणा आहे तो देश बाल्यादेशात आहे" असे त्यांनी नमूद केले आहे. या सर्वांगीण दृष्टीमुळेच न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी मराठ्यांच्या उदयाची मीमांसा समाजशास्त्रीय पद्धतीने केली. मराठ्यांच्या टाकसाळी आणि नाणे- पद्धतीचा अभ्यास न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांना करावासा वाटला. आणि त्याबाबतच्या लेखाच्या समारोपात त्यांनी भूत - वर्तमानाचा संवाद सूचित केला, हे उल्लेखनीय आहे. पेशवा डायऱ्यांच्या प्रास्तविकतही! न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांची चौफेर दृष्टी प्रत्ययाला येते. आणि या लेखाचा समारोप सुद्धा बोधरतेने होतो. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या सर्वस्पर्शी दृष्टीमुळेच रुढार्थाने 'ऐतिहासिक' नसलेल्या त्यांच्या लेखनातूनसुद्धा त्यांची ऐतिहासिक दृष्टी प्रत्ययाला येते.

**सारांश** :

मराठीतील आधुनिक इतिहास संकल्पना आणि इतिहासलेखनपद्धती यांची पायाभरणी करण्यात न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचा मोलाचा वाटा होता. भूतकाळाचा विविधांगी वेध नवा अन्वयार्थ, समाजशास्त्रीय परिशीलन, तात्वीक

बैठक वर्तमानाशी संवाद अशा सर्वच दृष्टीने न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे इतिहास विषयक कार्य महत्वपूर्ण असल्याचे दिसते. एक प्रबोधनकार या नात्याने एक साधन म्हणून त्यांनी इतिहासाचा प्रभावी वापर केला आणि सातत्याच्या प्रवाहाशी नाते राखून बदलाची व्यूवरचना आखली. म्हणूनच इतिहासकार आणि इतिहास- पुरुष अशा दुहेरी नात्यांनी न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांची थोरवी दिसते.

**संदर्भ सूची** :

1) आचार्य जावडेकर श.द., आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 1938, पृष्ठ - 102.

2) खानोलकर ग.दे., अर्वाचिन मराठी वाङमयसेवक, खंड-7, पृष्ठ 6.

3) फाटक न.रा., न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे चरित्र, पृष्ठ 564.

4) देशपांडे अरविंद, महाराष्ट्रातील वाटचाल, परामर्श, नोव्हेंबर 1988, पृष्ठ 37

5) कुलकर्णी अ.रा. मराठ्यांचे इतिहासकार, (इतिहासलेखन पध्दती) डायमंड पब्लिकेशन, पुणे, 2011, पृष्ठ 245

6) किता, पृष्ठ 247.